VISION ACADEMY

Make your future with us!

Make your Future with us





शिक्षण जे आयुष्याची दिशा ठरवतं

"गुण हे परिणाम आहेत. Vision ही प्रक्रिया आहे."

फक्त कोचिंग नाही. फक्त निकाल नाही. तर भविष्यासाठीचं एक सजग शिक्षण-तत्त्वज्ञान.

बदलत्या काळात बदलणारं शिक्षण :

आज शिक्षणाच्या जगाचं चित्र झपाट्यानं बदलतंय. प्रश्नही बदललेत- किती टक्के? किती रँक? कुठलं कॉलेज? इतक्यावरच शिक्षणाची व्याख्या थांबू नये, असं ठामपणे मानणारी संस्था म्हणजे Vision Academy.
पालकांच्या मनात सततचा ताण : "माझं मूल मागे तर पडणार नाही ना?"
विद्यार्थ्यांच्या मनात दडपण :"इतक्या स्पर्धेत मी टिकू शकेन का?"
शाळेपासून क्लासपर्यंतचा प्रवास : स्पर्धा, भीती आणि गोंधळाने भरलेला.
या सगळ्या गर्दीत Vision Academy एक वेगळा प्रश्न विचारते -
"आपण मुलांना फक्त परीक्षा पास होण्यासाठी शिकवतोय का...
आयुष्यासाठी घडवतोय?"

शिक्षण म्हणजे शर्यत नाही, तो एक प्रवास आहे :

Vision Academy शिक्षणाकडे धाव म्हणून पाहत नाही. इथे शिक्षण म्हणजे दीर्घकालीन, अर्थपूर्ण आणि शिस्तबद्ध प्रवास. या प्रवासात काय मिळतं? विद्यार्थ्यांना कृत्रिम घाईत ढकललं जात नाही. अवास्तव अपेक्षांचं ओझं त्यांच्या खांद्यावर टाकलं जात नाही. अपयशाची भीती दाखवून दबाव निर्माण केला जात नाही. त्याऐवजी इथे मिळतं घट्ट व स्पष्ट संकल्पनांचा पाया दिला जातो. विचार करण्याची सवय लावली जाते. आत्मविश्वास हळूहळू पक्का केला जातो. आयुष्यभर उपयोगी शिस्त आणि स्वनियोजनाची कला शिकवली जाते. Vision Academy मधला विद्यार्थी फक्त सिलॅबस पूर्ण करणारा नसतो; तो स्वत:ची क्षमता ओळखणारा, स्थिर मनाचा, उद्दिष्टाकडे सातत्याने वाटचाल करणारा असतो.

गुणांपलीकडचं शिक्षण :

आज अनेक पालकांच्या मनात न बोलली जाणारी भीती "माझं मूल मागे पडेल का? स्पर्धेत टिकेल का?" Vision Academy त्या भीतीकडे डोळेझाक करत नाही. आम्ही ती भीती शिस्त, नियोजन आणि योग्य मार्गदर्शनाने आत्मविश्वासात* रूपांतरित करतो. इथे स्पष्टपणे मान्य केलं जातं की गुण हे अंतिम ध्येय नाहीत. गुण म्हणजे प्रवासातील टप्पे आहेत. खरं ध्येय आहे स्पष्ट, सुसंगत विचारशक्ती निर्माण करणं, समस्यांकडे शांतपणे पाहण्याची दृष्टी देणं, चुका मान्य करून सुधारण्याची मनाची तयारी करणं, दडपणातही संतुलित राहण्याची सवय लावणं. जे हे शिकतात, ते परीक्षांमध्येही यशस्वी ठरतात आणि आयुष्यातही यशस्वी होतात!

विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाठी
व्हिजन अॅकडमीचा चार खांबांचा

दृष्टिकोन



शैक्षणिक उत्कृष्टता	स्पर्धा परीक्षा तयारी	भावनिक समतोल	भविष्यासाठी सज्जता
मजबूत शैक्षणिक पाया, संकल्पनांची स्पष्ट समज, बोर्ड आणि स्पर्धा परीक्षांसाठी सुसंगत तयारी.	JEE, NEET, MHT-CET, Olympiads यांची टप्प्याटप्प्याने ओळख आणि तयारी. भीती न वाढवता हळूहळू पातळी वाढवत	तणाव व्यवस्थापन, आत्मविश्वास निर्माण, अपयश स्वीकारण्याची मानसिक ताकद. "मी करू शकतो" ही आतून रुजलेली जाणीव आम्ही देतो.	STEM, AI, Robotics, Logical Thinking, Problem Solving यांचा प्रारंभिक पाया. भविष्यातील डिजटल आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी.

हा सर्वांगिण संगम Vision Academy ला केवळ कोचिंग न राहू देता शिक्षण-विचारधारा बनवतो. इथे विद्यार्थी घडतात, फक्त शिकवले जात नाहीत.

व्हिजन अॅकडमीमध्ये शिक्षक म्हणजे....

- मार्गदर्शक — दिशा दाखवणारे
- सल्लागार — वैयक्तिक मार्गदर्शक
- प्रेरणात्मक — स्वप्नांना उडाण देणारे





प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक दृष्टीने पाहिलं जातं.
कोणाला जास्त वेळ लागतो?
कोणाला आत्मविश्वास हवा?
कोणाला आव्हान द्यायचं?
कोणाला मानसिक आधार?
यामुळे विद्यार्थ्यांना समजून घेतल्याची भावना निर्माण होते.

पालकांसाठी खरी भागीदारी



Vision Academy साठी पालक हे शिक्षणाचे सहप्रवासी आहेत. नियमित प्रगती अहवाल स्पष्ट आकडेवारीसह मिळतात. मासिक पालक बैठकांमधून प्रामाणिक चर्चा होते. २४×७ WhatsApp सपोर्टद्वारे शंकानिरसन सुविधा आहे. अभ्यास बदल, अतिरिक्त मदत यासंबंधी पालक + विद्यार्थी + संस्था एकत्रित निर्णय घेतात. भविष्याचा विचार... आजपासून!
आजचं जग बदलतंय AI, तंत्रज्ञान, संशोधनात स्पर्धा वाढतेय. आम्ही या बदलाची जाण ठेवून आजचा अभ्यास हेच उद्याचं करिअर, आजची शिस्त हिच उद्याचा आत्मविश्वास, आजचा विचार हेच उद्याचं नेतृत्व तयार करण्यासाठी व्हिजन अॅकडमी सज्ज आहे.

VISION ACADEMY
Make your future with us!

5th | 6th | 7th | 8th | 9th | 10th FOUNDATION | NEET | IIT-JEE | MHT-CET



आमचं ध्येय

पुढची १०-१५ वर्ष डोळ्यासमोर ठेवून

विद्यार्थी घडवणे.

आमचे अभ्यासक्रम आणि बॅचेस :

फाउंडेशन (5 वी-8 वी)

Concept Building,
Logical Thinking,
Maths-Science.
सकाळ/संध्याकाळ बॅचेस उपलब्ध.

8 वी-10 वी (Board)

बोर्ड ९५%+
+ Foundation तयारी.
दुपार/संध्याकाळ सत्र.

11 वी - 12 वी Science

PCMB +
Entrance Preparation
पूर्णवेळ मार्गदर्शन.

JEE/NEET/MHT-CET 11 वी - 12 वी

Intensive Coaching
+ Test Series.

विशेष वैशिष्ट्ये

मर्यादित विद्यार्थी
डिजिटल कंटेंट + Practice Sheets
साप्ताहिक टेस्ट + विश्लेषण,
Personal Mentorship Program.

व्हिजनची ध्येय-धोरणे

प्रत्येक मोठ्या संस्थेमागे केवळ इमारती, वर्गखोल्या किंवा अभ्यासक्रम नसतो, तर एक स्पष्ट विचार, एक ठाम Vision आणि विद्यार्थ्यांवरचा विश्वास असतो. Vision Academy ही केवळ ट्यूशनची व्यवस्था नसून, शिक्षणाचं अंतिम उद्दिष्ट काय असावं? या मूलभूत प्रश्नावर उभी असलेली संस्था आहे. फक्त परीक्षा पास करणे हे आमचं ध्येय नाही; विद्यार्थ्याला आयुष्यभर उपयोगी पडेल अशी मानसिकता, अभ्यासातील शिस्त आणि विचारशक्ती देणे हेच आमचे खरे उद्दिष्ट आहे.

आमचे Vision:

आयुष्य घडवणारं शिक्षण Vision Academy ची Vision आहे शिक्षणाद्वारे आयुष्य परिवर्तन घडवणे. ही दृष्टी फक्त काही टॉपर घडवण्यापुरती मर्यादित नसून,प्रत्येक विद्यार्थ्याच्या अद्वितीय क्षमतेकडेप्रत्येक पालकाच्या अपेक्षांकडे आणि बदलत्या भविष्याच्या गरजांकडे लक्ष केंद्रित करते. आमचा ठाम विश्वास असा आहे की, प्रत्येक विद्यार्थी वेगळा असतो, पण योग्य मार्गदर्शन आणि योग्य वातावरण मिळाल्यास प्रत्येक जण उत्कृष्ट कामगिरी करू शकतो.

आमचे Mission:

फक्त अभ्यास नाही, तर जीवन घडविणे हे Vision Academy चे Mission आहे. विद्यार्थ्यांना केवळ शिकवणं नाही, तर त्यांना सर्वांगीण घडवणं. घडवणं म्हणजे विचारांची स्पष्टता, अभ्यासातील शिस्त, अपयश पचवण्याची क्षमता, सातत्य टिकवण्याची ताकद आणि स्वत:वरचा मजबूत आत्मविश्वास. आज अनेक विद्यार्थी हुशार असूनही गोंधळलेले दिसतात; क्षमता आहे पण दिशा नाही. आमची शैक्षणिक प्रक्रिया हा गोंधळ कमी करून योग्य दिशा देण्यावर आधारित आहे. आमचं तत्त्वज्ञान - शर्यत नव्हे,संयमाचा प्रवास आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेतील मोठी समस्या म्हणजे घाई-घाईने अभ्यासक्रम, घाईने रिव्हिजन आणि घाईने निकाल. Vision Academy विद्यार्थ्यांना या घाईपासून दूर ठेवते. इथे शिकण्याचा वेग ठरवतो की संकल्पना खरंच समजली आहे का? विद्यार्थी आत्मविश्वासात आहे का? पुढचा टप्पा पेलण्यास तो/ती तयार आहे का? आमचा विश्वास स्पष्ट असा आहे की हळू पण स्थिर प्रवास, वेगवान पण अस्थिर प्रवासापेक्षा नेहमीच श्रेष्ठ असतो.



VISION STEM & ROBOTICS



मुलांच्या हातात साधनं आली...
आणि विचारांना पंख फुटले!

इयत्ता 5 वी ते 10 वी साठी :-
उद्याची कौशल्ये, आजचा आत्मविश्वास!

शाळेतल्या एका दुपारी, 5 वी तल्या आरवने पहिल्यांदा एक छोटा रोबोट चालताना पाहिला. रोबोट फार मोठा नव्हता, पण आरवच्या डोळ्यांत त्याने मोठी चमक आणली होती. त्याने आश्चर्याने विचारलं, "सर, हा चालतो कसा?" शिक्षकांनी उत्तर देण्याऐवजी हळूच विचारलं, "तू सांगशील का? आपणच तो उघडून पुन्हा बनवून पाहूया!" त्या एका वाक्याने आरवच्या मनातील विज्ञानाची भीती पळाली आणि उत्सुकतेचं बीज रुजलं. Vision STEM & ROBOTICS मध्ये आम्ही मुलांना 'तयार उत्तरं' देत नाही; आम्ही त्यांना 'प्रश्न' विचारायला आणि स्वत: 'उपाय' शोधायला शिकवतो.

STEM म्हणजे नेमके काय?

STEM म्हणजे केवळ विज्ञान (Science), तंत्रज्ञान (Technology), अभियांत्रिकी (Engineering) आणि गणित (Maths) या विषयांची बेरीज नाही, तर ती विचार करण्याची एक आधुनिक पद्धत आहे. जेव्हा रस्ता चिखलाचा होतो, तेव्हा सामान्य मुलगा तक्रार करतो; पण STEM शिकलेला विद्यार्थी विचार करतो-"पाणी का साचलं? मातीचा प्रकार कोणता? कमी खर्चात पाण्याचा निचरा कसा करता येईल?" हीच 'शास्त्रीय नजर' मुलांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करते.

वर्गनिहाय प्रगतीचा आराखडा (Roadmap):

आम्ही मुलांच्या वयानुसार अभ्यासक्रमाची विभागणी केली आहे:
इयत्ता 5 वी (Curiosity Builder): मूलभूत STEM गेम्स आणि स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगची ओळख. "मी करू शकतो" ही सवय लावणे.
इयत्ता 6 वी (Basics of Making): साधे सर्किट्स आणि सेन्सर्सची प्राथमिक ओळख.
इयत्ता 7 वी (Logic & Control): कोडिंग लॉजिकची सुरुवात आणि ट्रायल्स-अँड-एरर पद्धत.
इयत्ता 8 वी (Design Thinking): आसपासच्या समस्या शोधून त्यावर 'प्रोटोटाइप' (नमुना मॉडेल) तयार करणे.
इयत्ता 9 वी व 10 वी (Career Readiness): तंत्रज्ञानातील करिअर संधींची ओळख आणि प्रगत प्रोजेक्ट्स (उदा. स्मार्ट होम ऑटोमेशन, फ्लड अलर्ट सिस्टम).

NEP 2020 आणि Vision ची कृती :

आमचा अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणाशी (NEP) सुसंगत आहे:
अनुभवाधारित शिक्षण: धडे पाठ करण्यापेक्षा प्रयोग करण्यावर भर.
टीकात्मक विचार (Critical Thinking): प्रश्न विचारण्याची आणि तर्क लावण्याची सवय.
कौशल्य विकास: व्यावसायिक शिक्षणाची (Vocational) पूर्वतयारी.
मूल्यांकन: गुणांपेक्षा 'गुणवत्तेवर' भर Vision मध्ये मुलांचे मोजमाप पेपरवरच्या मार्कांनी होत नाही. आम्ही मुलांचा 'प्रोजेक्ट पोर्टफोलिओ' तयार करतो. पालकांसमोर होणारे 'डेमो डे' सादरीकरण मुलांचा स्टेज-डेअरिंग आणि संवाद कौशल्य वाढवते.



आमची वैशिष्ट्ये:

'खेळ' नाही, 'कौशल्य'!



रोबोटिक्स

मन, हात आणि मेंदूचा संगम, रोबोटिक्स म्हणजे फक्त खेळणी बनवणे नाही. इथे मुले सेन्सर्स, मोटर्स, कोडिंग आणि ऊर्जा व्यवस्थापन शिकतात. रोबोट बनवताना मुले 'टीमवर्क' शिकतात-कोणी डिझाइन करतं, कोणी वायरिंग, तर कोणी कोडिंग. "येथे मुलांना 'फेल' होण्याची परवानगी आहे, कारण अपयश हीच संशोधनाची पहिली पायरी असते."



शिक्षणाची अनोखी शैली

(Story - Activity - Concept - Project)
आम्ही केवळ फळ्यावर शिकवत नाही. आमची पद्धत 'करून पाहण्यावर' (Learning by Doing) आधारित आहे. उदाहरण: जर 'जलप्रदूषण' हा विषय असेल, तर मुले प्रथम एक कथा ऐकतात, मग स्वत: फिल्टरचे पर्याय वापरून पाहतात आणि शेवटी स्वत:चा 'मिनी वॉटर फिल्टर' प्रोजेक्ट म्हणून सादर करतात.



सुरक्षित आणि आधुनिक STEM Lab :

STEM Lab :
मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी आम्ही जागतिक दर्जाची लॅब उपलब्ध करून दिली आहे:
साधने: रोबोटिक्स किट्स, सेन्सर किट्स, इलेक्ट्रॉनिक टूल्स आणि मेकॅनिकल मेकिंग टेबल्स.
सुरक्षा: मुलांच्या वयाला साजेसी साधने आणि तज्ज्ञांचे सतत निरीक्षण (Safety First).

पालकांसाठी एक विशेष संदेश :

तुमच्या घरात असे मूल आहे का, जे सतत प्रश्न विचारते? जे काहीतरी उघडून पाहण्याचा प्रयत्न करते? त्याला केवळ शिस्त लावू नका, तर त्याला Vision STEM & ROBOTICS ची संधी द्या. आम्ही शाळेच्या शिक्षणाला आधुनिक कौशल्यांची जोड देऊन तुमच्या मुलाचा आत्मविश्वास वाढवतो.
"शिक्षण म्हणजे केवळ धडे पाठ करणे नाही, तर जीवनासाठी सक्षम होणे आहे."

"गुणांपलीकडचं शिक्षण : भक्कम संकल्पना, स्थिर आत्मविश्वास"

भक्कम पाया, निश्चित भविष्य : इयत्ता ८ वी , ९ वी , १० वी हा टप्पा केवळ गुणांचा नाही, तर भविष्यातील पाया पक्का करण्याचा काळ आहे. या काळात योग्य दिशा, योग्य मार्गदर्शन आणि योग्य सवयी मिळाल्या तर ११ वी - १२ वी तसेच स्पर्धा परीक्षांचा प्रवास खूप सहज आणि आत्मविश्वासाने पूर्ण होतो. Vision Academy चा Foundation व Day Care Programme हाच मजबूत पाया घालण्याचा आणि मुलांना शांत, नियोजनबद्धपणे पुढच्या पातळीला नेण्याचा एक सुसंघटित प्रयत्न आहे.

लवकर सुरुवात: दडपण नव्हे, तयारी, पालकांच्या मनातला मोठा प्रश्न नेहमी असतो की, पाल्यांच्या भविष्याची सुरुवात आता करावी की अजून वेळ आहे? Vision Academy याचं स्पष्ट उत्तर देते हो, वेळ आहे; पण हा वेळ वाया जाऊ नये, ही खरी काळजी आहे. लवकर सुरुवात म्हणजे मुलाच्या खांद्यावर अतिरिक्त ओझं टाकणं नाही, तर भविष्यात उद्भभाणारे अभ्यासाचे ओझे कमी करण्याची प्रक्रिया आहे. उशिरा सुरु झालेली तयारी म्हणजे अचानक वाढलेला अभ्यास, गोंधळलेलं विद्यार्थी आणि ढासळणारा त्यांचा आत्मविश्वास; लवकर सुरू केलेली तयारीच विद्यार्थ्यांना भविष्यात अभ्यासात उत्कृष्टतेकडे घेऊन जाते.

Vision मध्ये काय घडतं ? Vision मध्ये विद्यार्थ्यांना अचानक खोल पाण्यात ढकललं जात नाही, तर हळूहळू पोहायला शिकवलं जातं. संकल्पना नीट समजावून घेणं, रोज थोडं-थोडं काम करणं आणि चुका शांतपणे सुधारत जाणं हा इथला अभ्यासाचा स्वभाविक प्रवाह आहे, कृत्रिम स्पर्धा किंवा घाई नाही. यामुळे विचार करण्याची पद्धत बदलते विद्यार्थी फक्त उत्तर काढत नाही, तर का? आणि कसं? विचारायला शिकतो. अभ्यास सवय बनतो. परीक्षा जवळ आली की होणारा अचानक ताण मोठ्या प्रमाणात कमी होतो. विद्यार्थी संकल्पनांच्या पातळीवर आधीच तयार असल्यामुळे त्याचा आत्मविश्वास वाढतो आणि नंतर केवळ त्यांच्या ज्ञानाचे लेखी परीक्षेत रूपांतर करणे बाकी राहते.

Personalized Learning आणि Mentor Culture : Vision मध्ये बॅचेस जाणीवपूर्वक मर्यादित ठेवल्या जातात, ज्यामुळे शिक्षक प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक पातळीवर ओळखू शकतात. कमकुवत भाग, सवयी, वेळ व्यवस्थापन यावर लक्ष देऊन प्रत्येकांसाठी वेगळं मार्गदर्शन तयार केलं जातं. आपले शिक्षकवृंद फक्त अध्यापन करणारे शिक्षक नसून, विद्यार्थ्यांच्या मनस्थितीकडे लक्ष देणारे, योग्य वेळी आधार देणारे आणि योग्य दिशेला दर्शविणारे मार्गदर्शक असतात.

Process-Oriented, Stress-Free Education : Foundation व Day Care Programme मध्ये भर केवळ निकालावर नसून, प्रक्रियेवर असतो कारण प्रक्रिया भक्कम असेल तर निकाल आपोआप घडतात. नियमित अभ्यास, सातत्यपूर्ण चाचण्या, त्याचं सखोल विश्लेषण आणि त्यावर आधारित सुधारणा योजना, यामुळे विद्यार्थ्यांला स्वत:च्या प्रगतीचा उंचावलेला आलेख स्पष्ट दिसून येतो. त्याचबरोबर तणाव व्यवस्थापन, प्रेरणादायी संवाद आणि अडचणींवर मात करून पुन्हा उभं राहण्याची तयारी या गोष्टींमुळे अभ्यास हा ताण न राहता समज वाढवणारा प्रवास बनतो.

पालकांसाठी आश्वासन : लवकर सुरुवात ही मुलांसाठी दबाव नसून, योग्य प्रकारे केलेली दीर्घकालीन गुंतवणूक आहे आज घातलेली सवय, उद्याचा आत्मविश्वास ठरवते. व्हिजनच्या प्रोग्राम मधून Vision Academy विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध दिनचर्या, स्पष्ट उद्दिष्ट, उत्कृष्ट प्रगती आणि सुरक्षित शैक्षणिक वातावरण देण्याचे कार्य यामध्यमातू होते. याच वातावरणात विद्यार्थी स्वत:ची सर्वोत्तम आवृत्ती घडवतात आणि १० वी नंतरच्या प्रत्येक पायरीवर अधिक तयार, अधिक स्थिर आणि अधिक निश्चिंतपणे उभं राहतात.

VISION ACADEMY
Make your future with us!

5th | 6th | 7th | 8th | 9th | 10th FOUNDATION | NEET | IIT-JEE | MHT-CET

Vision Academy
केवळ शिकवण्याची नव्हे, विद्यार्थी घडवण्याची जागा.

Vision Academy मध्ये आम्ही विद्यार्थ्यांना काय पाठ करायचं ते शिकवत नाही, तर कसं विचार करायचं ते शिकवतो. आजच्या शिक्षणपद्धतीत विद्यार्थी खूप काही पाठ करतात, पण फारसं समजून घेत नाहीत; इथे मात्र घोकंपट्टीऐवजी तर्क, समज आणि उपयोगाला केंद्रस्थानी ठेवून खरा बौद्धिक विकास घडवला जातो.

आमची शैक्षणिक तत्त्वज्ञान:

Concept → Application →Competition Vision Academy ची संपूर्ण शिकवण्याची रचना तीन स्पष्ट टप्प्यांवर आधारलेली आहे Concept → Application → Competition. ही केवळ एक ओळ नसून, विद्यार्थ्याला बोर्ड परीक्षेतले गुण, स्पर्धा परीक्षेतील यश आणि पुढच्या आयुष्यातील विचारशक्ती यांचा मजबूत पाया घालणारी संपूर्ण शैक्षणिक तत्त्वज्ञान आहे.

टप्पा 1
Conceptual Clarity
संकल्पना स्पष्ट, पाया मजबूत

संकल्पना नीट समजल्या नाहीत, तर पुढचं सगळं ढासळतं, म्हणूनच Vision Academy मध्ये शिकण्याचा प्रवास का? या प्रश्नापासून सुरू होतो. प्रत्येक धड्यात विषयाचा मूळ अर्थ समजावून सांगितला जातो, दैनंदिन जीवनातील उदाहरणांद्वारे संकल्पना रुजवली जाते आणि घाई न करता मुलाच्या गतीनुसार अभ्यास पुढे नेला जातो. विद्यार्थी हे शिकतोय कारण काय?
आणि याचा उपयोग कुठे होतो?
याची जाणीव झाल्यावर अभ्यास ओझं न राहता आनंदमय प्रवास बनतो.



टप्पा 2
Application Based Learning
शिकलेलं वापरायला शिकणं

आजच्या काळात फक्त उत्तर मिळणं पुरेसं नाही, तर त्या उत्तरामागचा विचार समजणं अधिक महत्त्वाचं आहे. Vision Academy मध्ये विद्यार्थी फक्त प्रश्नांची उत्तरं काढत नाही, तर वेगवेगळ्या पद्धती वापरून पाहतो, चुका करतो, सुधारतो आणि हे सूत्र इथे का लागू होतं? किंवा परिस्थिती बदलली तर काय होईल? असे प्रश्न विचारून विषय खोलवर समजून घेतो. या Application-Based Learning मुळे विद्यार्थी लॉजिकल विचार करायला शिकतो, नवीन प्रकारचे प्रश्न आत्मविश्वासाने सोडवतो आणि हा प्रश्न वेगळा आहे म्हणून घाबरण्याची मानसिकता मागे सोडतो.

टप्पा 3
Competitive Exam Readiness
स्पर्धेसाठी सज्ज, पण न घाबरलेला

विद्यार्थीस्पर्धा परीक्षा म्हणजे फक्त MCQ नव्हे, ती वेग, अचूकता आणि शांत मनाची खरी कसोटी असते. Vision Academy मध्ये ही तयारी अचानक सुरू होत नाही, भीती दाखवून किंवा "हे येणारच आहे" असा दबाव टाकून केली जात नाही; उलट संकल्पना पक्क्या झाल्यानंतर, Application मजबूत झाल्यानंतरच हळूहळू आणि शिस्तबद्ध पद्धतीने स्पर्धात्मक प्रश्नांवर काम केलं जातं. त्यामुळे आमचे विद्यार्थी परीक्षेला घाबरत नाहीत, पेपर पाहून गोंधळत नाहीत आणि वेळेचं व्यवस्थापन कौशल्य आत्मसात करून पेपर आत्मविश्वासाने पूर्ण करतात.

आमची खरी ओळख प्रक्रिया-केंद्रित शिक्षण

बाजारात अनेक संस्था फक्त निकालांचे फोटो दाखवतात, पण Vision Academy स्वतःची ओळख निकालांपेक्षा प्रक्रियेत शोधते. आमचा ठाम विश्वास आहे की प्रक्रिया योग्य असेल, तर निकाल हा नैसर्गिक परिणाम असतो; Concept समजला, Application जमली, तर Competition निःसंशयपणे जिंकता येते. म्हणूनच आपल्या मुलाला केवळ पुढच्या परीक्षेसाठी नव्हे, तर पुढच्या संपूर्ण आयुष्यासाठी तयार करायचं असेल, तर Vision Academy ची ही वेगळी, विचारांची आणि मूल्यांची शैक्षणिक वाटचाल त्याच्यासाठी योग्य ठरते.

घोकंपट्टीविरुद्ध आमचा ठाम दृष्टिकोन :

घोकंपट्टीवर आधारलेलं शिक्षण अल्पकाळात गुण देऊ शकतं, पण दीर्घकाळात विचारशक्तीची हानी करते. फक्त पाठांतर केल्यामुळे विद्यार्थी लवकर विसरतो, प्रश्न थोडा बदलला की अडखळतो आणि आत्मविश्वास ढासळतो; Vision Academy मात्र याउलट समज वाढवते, विचारशक्ती मजबूत करते आणि विद्यार्थ्याला समस्यांवर स्वतंत्रपणे विचार करणारा बनवते. त्यामुळे आमचं शिक्षण केवळ तात्पुरत्या गुणांसाठी नसून, दीर्घकालीन यश आणि आयुष्यभर उपयोगी पडणारी बौद्धिक स्वतंत्रता घडवण्यासाठी असतं.

विद्यार्थ्यांमध्ये दिसणारा खरा बदल

Vision Learning Philosophy मुळे "मला येत नाही" म्हणणारा विद्यार्थी हळूहळू "मी प्रयत्न करतो" असं म्हणायला लागतो. प्रश्न पाहून घाबरण्याऐवजी तो विचार करायला शिकतो, शिक्षकावर पूर्ण अवलंबून न राहता स्वत: निर्णय घेऊ लागतो आणि अभ्यासाकडे तक्रारीने नव्हे तर जबाबदारीने पाहू लागतो. हा बदल हळूहळू घडतो, पण पक्का आणि कायमस्वरूपी असतो — याच बदलामुळे *पालक आणि विद्यार्थी Vision Academy ला केवळ एका coaching class म्हणून नव्हे, तर व्यक्तिमत्त्व घडवणारी शैक्षणिक संस्था म्हणून ओळखतात.

व्हिजन अॅकॅडमी:
जिथे केवळ विषय शिकवले जात नाहीत, तर भविष्य घडवले जाते!

शिक्षण ही केवळ कागदी पदव्या मिळवण्याची प्रक्रिया नाही, तर ती एका पिढीला सुसंस्कृत आणि समर्थ बनवण्याची साधना आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात NEET, JEE, MHT-CET आणि Olympiad सारख्या परीक्षांची तयारी करताना विद्यार्थी केवळ पुस्तकी ज्ञानाने यशस्वी होऊ शकत नाही. त्याला गरज असते ती एका खंबीर आधाराची, योग्य दिशेची आणि विश्वासाच्या नात्याची. 'Vision Academy' याच विश्वासावर उभी आहे.

आमचे शिक्षक: केवळ तज्ज्ञ नव्हे, तर आयुष्याचे मार्गदर्शक

काही शिक्षक विषय शिकवतात, तर काही शिक्षक आयुष्य घडवतात." व्हिजन अॅकॅडमीमधील शिक्षक हे केवळ उच्चशिक्षित डिग्रीधारक नाहीत, तर ते अनुभवाचे गाठोडे असलेले 'मेन्टोर्स' आहेत. स्पर्धा परीक्षांचा दबाव, बदलता पॅटर्न आणि विद्यार्थ्यांची मानसिकता या शिक्षकांनी स्वत: अनुभवलेली आहे.
अनुभव + संवेदनशीलता: आमचे शिक्षक विद्यार्थ्यांवर अवास्तव अपेक्षांचे ओझे लादत नाहीत, तर त्यांना आत्मविश्वासाने संकटांचा सामना करायला शिकवतात.
शिस्त आणि प्रेम यांचा संगम: येथे शिस्तीशी तडजोड केली जात नाही, पण त्याच वेळी विद्यार्थ्याला भीती वाटणार नाही अशा पद्धतीने संवाद साधला जातो.



शैक्षणिक आणि भावनिक संतुलन (Academic + Emotional Balance)

आजचे विद्यार्थी हुशार आहेत, पण स्पर्धेमुळे ते भावनिकदृष्ट्या लवकर थकतात. व्हिजन अॅकॅडमीमध्ये आम्ही सततची तुलना टाळतो. आमच्यासाठी अपयश हा 'शेवट' नसून 'सुधारण्याची संधी' आहे. यामुळे विद्यार्थी स्थिर, शांत आणि अधिक आत्मविश्वासी बनतो.

विश्वासातून शिस्त आणि शिस्तीतून यश

जेव्हा पालक, विद्यार्थी आणि संस्था एकाच ध्येयासाठी एकत्र येतात, तेव्हा निकाल नैसर्गिकरित्या मिळतात. आम्ही घाई करत नाही, पण थांबतही नाही. आमची पद्धत ही विद्यार्थ्याला जबाबदार बनवण्यावर भर देते. व्हिजन अॅकॅडमीसाठी शिक्षण म्हणजे 'करार' नसून एक 'नातं' आहे. आयुष्याच्या या महत्त्वाच्या टप्प्यावर विद्यार्थ्याला माणुसकी, विश्वास आणि योग्य मार्गदर्शनाची जोड देऊन त्याला यशाच्या शिखरावर पोहोचवणे, हेच आमचे ब्रीदवाक्य आहे

मेंटॉरशिप प्रोग्राम:

"तू एकटा नाहीस!" स्पर्धेच्या या जगात अनेकदा विद्यार्थी स्वत:ला हरवल्यासारखे अनुभवतात. व्हिजन अॅकॅडमीचा 'Mentor-Student' उपक्रम यावर खात्रीशीर उपाय आहे. प्रत्येक बॅचसाठी एक स्वतंत्र मार्गदर्शक (Mentor) नियुक्त केला जातो.
वैयक्तिक लक्ष: अभ्यासाचे नियोजन करणे, अडचणी सोडवणे आणि प्रगतीचा आढावा घेणे ही मेंटॉरची जबाबदारी असते.
भावनिक आधार: "क्लासमध्ये न समजलेली गोष्ट मी मेंटॉरला न घाबरता विचारू शकतो," हा विद्यार्थ्याचा विश्वासच आमचे यश आहे.

त्रिसुत्री
पालक, विद्यार्थी आणि अॅकॅडमीची भागीदारी

शिक्षण हा केवळ सेवेचा व्यवहार नसून ती एक सामूहिक जबाबदारी आहे, असे व्हिजन अॅकॅडमी ठामपणे मानते.

पालकांशी प्रामाणिक संवाद

पालकांना केवळ फी भरणारे घटक न मानता 'शैक्षणिक भागीदार' मानले जाते. नियमित सभा (PTM), प्रगती अहवाल आणि विद्यार्थ्यांच्या अडचणींवर पालकांशी केली जाणारी थेट चर्चा यामुळे पारदर्शकता राहते.

विद्यार्थी हाच केंद्रबिंदू

अॅकॅडमीचे सर्व नियम आणि धोरणे हे विद्यार्थ्याचा दीर्घकालीन फायदा लक्षात घेऊनच आखले जातात.

"व्हिजन अॅकॅडमीमुळे आम्ही पालक म्हणूनही निश्चिंत झालो आहोत, कारण आमचं मूल इथे केवळ सुरक्षित नाही, तर योग्य दिशेने प्रगती करत आहे." - एक समाधानकारक पालक.

व्हिजन अॅकॅडमी फाउंडेशन प्रोग्राम
भविष्यातील यशाची भक्कम पायाभरणी
पाया मजबूत असेल, तर यश आपोआप उंच जातं.

व्हिजन अॅकॅडमीच का ?

भक्कम संकल्पनात्मक स्पष्टता (Conceptual Clarity): इथे पाठांतर किंवा घोकंपट्टीला स्थान नाही. गणित, भौतिकशास्त्र (Physics), रसायनशास्त्र (Chemistry), जीवशास्त्र (Biology), मेंटल अबिलिटी आणि इंग्रजी या विषयांच्या मुळाशी जाऊन आम्ही विद्यार्थ्यांना 'काय', 'का' आणि 'कसे' हे समजावून सांगतो.
शिस्तबद्ध पण दडपणमुक्त शिक्षण: आमची दिनचर्या अशी आखलेली असते की विद्यार्थ्याला अभ्यासाचा कंटाळा येत नाही. नियमित अभ्यास आणि विविध उपक्रम/प्रयोग यांचा योग्य समतोल इथे साधला जातो.
शिक्षक नव्हे, मेंटॉर: आमचे अनुभवी शिक्षक विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था ओळखून त्यांना हवे तेव्हा शैक्षणिक आणि भावनिक आधार देतात. यामुळे विद्यार्थी मोकळेपणाने प्रश्न विचारू शकतात.

गैरसमज मोडून काढणारी नवी दृष्टी

अनेक पालकांना वाटते की 'फाउंडेशन' म्हणजे लहान वयातच मुलांवर स्पर्धा परीक्षांचे ओझे टाकणे किंवा त्यांना ताण देणे. पण व्हिजन अॅकॅडमी हा गैरसमज मोडून काढते. आमच्यासाठी फाउंडेशन म्हणजे- "आजचा अभ्यास, उद्याचा आत्मविश्वास." 5 वी ते 10 वी हा काळ केवळ पाठ्यपुस्तके वाचण्याचा नसून तो विचारशक्ती विकसित करण्याचा आणि अभ्यासाची शिस्त लावण्याचा सुवर्णकाळ आहे.

शाळा + स्पर्धा परीक्षा एक संतुलित संगम

व्हिजन अॅकॅडमीचा अभ्यासक्रम हा शाळा आणि स्पर्धा परीक्षा यांचा सुवर्णमध्य आहे.
फाउंडेशन अॅकॅडमिक्स: राज्य बोर्ड आणि CBSE च्या अभ्यासक्रमाशी पूर्णपणे सुसंगत अशा पद्धतीने आम्ही शिकवतो. सराव परीक्षा Subjective आणि Objective अशा दोन्ही पद्धतीने घेतल्या जातात.
स्पर्धा परीक्षांची ओळख: अगदी लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना IMO, IEO, NSO (Olympiads), डॉ. होमी भाभा परीक्षा, MTSE, नवोदय, NMMS आणि महाराष्ट्र राज्य शिष्यवृत्ती परीक्षा यांसारख्या परीक्षांची तयारी करून घेतली जाते.
कौशल्य विकास: याद्वारे विद्यार्थ्यांना बहुपर्यायी प्रश्न (MCQs) सोडवण्याची सवय लागते, वेळ व्यवस्थापन (Time Management) जमते आणि त्यांची अचूकता वाढते.

फाउंडेशन प्रोग्रामचे फलित

व्हिजन अॅकॅडमीमध्ये शिकलेला विद्यार्थी जेव्हा 10 वी पूर्ण करतो, तेव्हा तो केवळ उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत नाही, तर 11 वी-12 वी च्या JEE, NEET, CET सारख्या परीक्षांसाठी तो पूर्णपणे तयार असतो. त्याला '11 वी चा शॉक' बसत नाही, कारण त्याचा पाया आधीच भक्कम झालेला असतो.

आधुनिक तंत्रज्ञान आणि अत्याधुनिक सुविधा

आजच्या युगाशी पाऊल जुळवून घेण्यासाठी व्हिजन अॅकॅडमीने शिक्षणाची पद्धत आधुनिक केली आहे.
Future-Ready Learning: आम्ही केवळ पुस्तकी ज्ञान देत नाही, तर STEM लॅब, Robotics किट्स, आणि AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) आधारित उपक्रमांच्या माध्यमातून विज्ञान आणि गणित 'अनुभवायला' शिकवतो. VR/AR तंत्रज्ञानामुळे अवघड संकल्पना डोळ्यांसमोर जिवंत होतात.
स्वतंत्र बॅचेस: राज्य बोर्ड (State Board) आणि CBSE साठी स्वतंत्र बॅचेसची व्यवस्था आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा गोंधळ उडत नाही.
स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर: सुरक्षित वातावरण, सुसज्ज प्रयोगशाळा, आणि अभ्यासिका (Self-study facility) यामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासात मन रमते.

पालकांसाठी आवाहन :

जर तुम्हाला तुमच्या पाल्याचे भविष्य सुरक्षित आणि यशस्वी करायचे असेल, तर त्याची सुरुवात आजच 'योग्य पायाभरणी' पासून करा.

व्हिजन अॅकॅडमी फाउंडेशन प्रोग्राम
जिथे स्वप्नांना मिळते वास्तवाची जोड!

VISION ACADEMY
Make your future with us!

5th | 6th | 7th | 8th | 9th | 10th FOUNDATION | NEET | IIT-JEE | MHT-CET

व्हिजन अॅकॅडमी केवळ अभ्यास नव्हे, भविष्याचा मक्कम पाया!



"जेव्हा मूल कोणाच्याही सांगण्याशिवाय स्वतःहून अभ्यासाला बसते, तेव्हा समजावे की खऱ्या अर्थाने त्याचे शिक्षण सुरू झाले आहे."

आजच्या स्पर्धात्मक युगात पालकांची सर्वात मोठी चिंता असते, "माझं मूल अभ्यासाला बसत नाही." पण विचार करा, दोष मुलांचा आहे की आपण त्यांना लावलेल्या अभ्यासाच्या सवयीचा? व्हिजन अॅकॅडमी (Vision Academy) मध्ये आम्ही शिक्षणाची हीच व्याख्या बदलली आहे. आम्ही पाठांतर करून घेणारे 'कोचिंग सेंटर' नसून, विद्यार्थ्याला आत्मनिर्भर बनवणारे 'लर्निंग सेंटर' आहोत.

Self-Study: आत्मनिर्भरतेची पहिली पायरी

बऱ्याच ठिकाणी अभ्यासाला एक 'शिक्षा' मानले जाते. व्हिजन अॅकॅडमीमध्ये आम्ही Self-Study ही एक आनंददायी 'सवय' म्हणून विकसित करतो.

Monitored Self-Study: आम्ही विद्यार्थ्याला अभ्यासासाठी एकटे सोडत नाही, पण त्यांच्या डोक्यावर सतत उभेही राहत नाही. योग्य वेळ, योग्य जागा आणि *तज्ज्ञांचे मार्गदर्शन यांच्या संगमातून 'स्वातंत्र्य + शिस्त' असा सुवर्णमध्य साधला जातो.

नियोजित दिनचर्या: कोणता विषय, किती वेळ आणि कोणत्या पद्धतीने वाचायचा, याचे नियोजन आधीच ठरलेले असते.

बदल: जेव्हा विद्यार्थ्याला स्वत:हून समजते की "मी हे करू शकतो", तेव्हा त्याचा आत्मविश्वास गगनाला भिडतो.

NEP 2020: बदलत्या काळाचे प्रगत शिक्षण :

आजचे जग AI (Artificial Intelligence), रोबोटिक्स आणि डेटा सायन्सच्या दिशेने वेगाने धावत आहे. अशा वेळी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP २०२०) ची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हिजन अॅकॅडमीच्या वर्गावर्गांत दिसते.

संकल्पनात्मक स्पष्टता : पाठांतराऐवजी 'का' आणि 'कसे' यावर आमचा भर असतो.

भविष्यासाठी सज्ज (Future-Ready) : आमचा विद्यार्थी फक्त परीक्षार्थी नसून विचार करणारा, प्रश्न विचारणारा आणि नवनवीन बदल स्वीकारणारा 'इनोव्हेटर' म्हणून घडतो.

कौशल्य विकास: क्रिटिकल थिंकिंग, प्रॉब्लेम सॉल्व्हिंग आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर या त्रिसूत्रीवर आम्ही काम करतो

STEM, AI आणि Robotics:

अनुभवातून शिक्षण "हे शिकून मला काय उपयोग?" या विद्यार्थ्यांच्या प्रश्नाचे उत्तर आम्ही अनुभवातून देतो. विज्ञान आणि गणित हे विषय आता फळ्यावरचे न राहता हातातील प्रयोगांचे झाले आहेत.

STEM विचारपद्धती: Science, Technology, Engineering आणि Mathematics यांना एकत्र जोडून शिकवण्याची आमची पद्धत विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती निर्माण करते.

Robotics Lab: 5 वी ते 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी खास Robotics Kits आणि AI आधारित उपक्रम उपलब्ध आहेत. यामुळे गणित जिवंत वाटते आणि विज्ञान सोपे होते.

करिअरची दिशा: लहान वयातच तंत्रज्ञानाची ओळख झाल्यामुळे JEE, NEET, आणि संशोधन क्षेत्रातील करिअरची बीजं इथेच रोवली जातात.

शिस्त: भीतीतून नव्हे, रचनेतून! :

आमच्याकडे शिस्त म्हणजे ओरडणे किंवा दडपण नव्हे. व्हिजन अॅकॅडमीमध्ये शिस्त ही दैनंदिन रचनेतून (Structure) येते. ठरलेली दिनचर्या आणि कामातील सातत्य यामुळे विद्यार्थ्यांच्या सवयीत बदल होतो. ही शिस्त तात्पुरती परीक्षपुरती नसते, तर ती आयुष्यभर साथ देणारी असते.

पालकांसाठी आमचा शब्द:

"व्हिजन अॅकॅडमीमध्ये तुमचा पाल्य केवळ परीक्षेच्या निकालासाठी तयार होत नाही, तर तो आयुष्याच्या परीक्षेसाठी खंबीर होतो. इथे अभ्यासाचा अर्थ टेस्ट स्कोअर नसून उद्याचा आत्मविश्वास आहे."

Vision | Nursery & Pre-Primary School



आमची भूमिका: अभ्यासाची शर्यत नाही, आयुष्याची शाळा!

बालपणाला घाई नाही-मुळं मजबूत झाली की भविष्य आपोआप उंच होतं." आमची दृष्टी जागतिक स्तरावर नावाजलेल्या 'Finland Early Childhood Education' पद्धतीवर आधारित आहे. जिथे बालपण हा 'तयारीचा काळ' नसून, तो स्वत:मध्ये एक अर्थपूर्ण आयुष्याचा टप्पा मानला जातो. आमचं सूत्र: आम्ही फक्त 'टॉपर्स' घडवत नाही; आम्ही 'माणसं' घडवतो.

आमची 4 मुख्य तत्त्वे (Finland-प्रेरित):

सहज जिज्ञासा : मुलाचं मोडतोड करणं आणि पुन्हा बनवणं हेच त्याचं 'पहिलं संशोधन' आहे.

खेळ हेच शिक्षण: खेळ म्हणजे वेळ घालवणं नाही, तर ती 'मेंदूची जिम' आहे.

भावनिक सुरक्षा: रडणं हा नखरा नाही, तो संवाद आहे. सुरक्षित मन अधिक चांगलं शिकतं.

शिक्षक एक मार्गदर्शक : शिक्षक पुढे उभा राहत नाही; तो सोबत चालतो.

योग्य वयात, योग्य शिक्षण : घाई न करता

Senior KG (4-5 वर्षे): संकल्पनांची समज.
फोकस: पूर्व-वाचन (Pre-reading), आकृतीबंध आणि वस्तूंमार्फत मोजणी.

School Readiness (5-6 वर्षे): पहिलीसाठी सज्जता.
फोकस: आत्मविश्वास, स्वावलंबन आणि अक्षर-ध्वनींची ओळख.

समस्या वास्तव: घाई नेहमीच योग्य नसते!

आज अनेक घरांमध्ये एक चिंता असते "माझं मूल स्पर्धेत मागे तर पडणार नाही ना?" या काळजीतून बालपण हळूहळू एक 'प्रोजेक्ट' बनू लागतं. मूल प्रश्नांऐवजी 'उत्तरं' शोधू लागतं.

Vision चा नियम: शिकणं हे आधी 'भितीमुक्त' असलं पाहिजे, तरच ते खोलवर जातं. शांत मन शिकतं; घाबरलेलं मन फक्त निभावतं.

वयोगट आणि कार्यक्रम रचना.

Vision Nursery (2-3 वर्षे): 'मऊ' बदल.
घराकडून शाळेकडे आनंदाने जाण्याचा प्रवास.
फोकस: इंद्रिय-अनुभव आणि भाषेचा नैसर्गिक संपर्क.

Junior KG (3-4 वर्षे): व्यक्त होण्याचा काळ.
फोकस: सामाजिक जाणीव, गोष्टी, गाणी आणि खेळातून पेन्सिल पकडण्याचे कौशल्य.

अभ्यासक्रम: विषय नाही, 'थीम्स' (Themes)

आमचे शिक्षण सात मुख्य क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करते:
1. भाषा व संवाद 2. तर्कशक्ती व गणित 3. शारीरिक विकास 4. सामाजिक कौशल्य
5. सर्जनशीलता 6. जीवन कौशल्य 7. पर्यावरण जाणीव
उदाहरण: जेव्हा मूल ब्लॉक्सचा टॉवर बनवतं, तेव्हा ते फक्त खेळत नाही; तर ते समतोल, संयम आणि अपयशानंतर पुन्हा उभं राहणं शिकत असतं.

आम्ही बालपण जपतो भविष्य घडवतो!

शिकवण्याची व मूल्यमापनाची पद्धत

बाल-केंद्रित:
प्रत्येक मुलाची शिकण्याची गती वेगळी असते. आम्ही त्यांची तुलना करत नाही.

वर्गखोली 'तिसरा शिक्षक':
आमच्या वर्गखोल्यांमध्ये 'लर्निंग कॉर्नर्स' आहेत, जे मुलांना स्वतःहून शिकण्यास प्रवृत्त करतात.

परीक्षा नाही, 'वाढ' मोजणे
आम्ही लेखी परीक्षा घेत नाही. त्याऐवजी शिक्षकांचे निरीक्षण (Teacher Notes) आणि मुलाचा 'पोर्टफोलिओ' यावर भर देतो.

आम्ही तुमच्या मुलाला भविष्यात ढकलत नाही. आम्ही त्याचं वर्तमान जपतो, जेणेकरून भविष्य आपोआप मजबूत होईल.

बालपण वाचलं तर शिक्षण आपोआप फुलतं

शिक्षक, सुविधा आणि सुरक्षितता

प्रशिक्षित शिक्षक
ECCE / Montessori प्रशिक्षित शिक्षक, जे मुलांच्या वर्तनाचे मार्गदर्शक (Mentor) आहेत.

सुरक्षित पायाभूत सुविधा
बाल-सुरक्षित फर्निचर, मुक्त हालचालीसाठी मोकळी जागा आणि निसर्ग सहवास.

आरोग्य व स्वच्छता
मुलांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड नाही.

11 वी आणि 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'डे केअर' प्रोग्राम का निवडावा?

01 व्यवस्थित आणि नियोजित अभ्यास वेळापत्रक
02 सुपरवाइज्ड सेल्फ-स्टडी (मार्गदर्शित स्व-अभ्यास)
03 तज्ञ शिक्षकांचे सतत मार्गदर्शन
04 परीक्षा-केंद्रित तयारी
05 प्रगतीचे सातत्यपूर्ण विश्लेषण
06 समतोल आणि तणावमुक्त दिनचर्या
07 स्पर्धा परीक्षा तयारीसाठी उपयुक्त
08 सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अभ्यासाला पूरक वातावरण
09 वैयक्तिक लक्ष आणि करिअर मार्गदर्शन
10 वेळेची बचत आणि सातत्य

FOUNDATION 5th 6th 7th 8th 9th 10th

MTSE, IMO, NSO, IEO, NSTSE, DR. HOMI BHABHA, NMMS, IOQ, ASSET



ADMISSION OPEN
Hurry Up!

Separate Batches

Std. 5th to 10th
Foundation + State Board

Std. 5th to 10th
Foundation + CBSE Board

प्रवेशासाठी संपर्क

VISION ACADEMY
Make your future with us!

विवेक सिंधू कॉम्प्लेक्स समोर, महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या शेजारी, अंबाजोगाई.
8055847820, 8055847821

धोंडे कॉम्प्लेक्स, पंडित शाळेसमोर, अहिल्यानगर रोड, आष्टी.
8055847886, 8055847887

जे.पी. कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेट समोर, जामखेड.
8055847851, 8055847852